भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

HX 310195

दि. ६/१२/२०१४ र.नं. ४०५६ किंमत १००

नांव :- सी एस आर डी ...

हस्ते :- ...

31 JAN 2014

प्रशांत रा. भालेराव
मुद्रांक विक्रेता प.क्र. १०/९६
तहसील कार्यालय आवार, अ.नगर

## त्रिपक्षिय सामंजस्य करार

पक्ष - 1 प्रकल्प प्रशिक्षण संस्था [PTO] - संचालक, सी.एस.आर.डी

पक्ष - 2 प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा [PIA] तथा मंडल कृषी अधिकारी, अकोलनेर ता. नगर

पक्ष - 3 प्रकल्प व्यवस्थापक [WCDC] तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, अहमदनगर

केंद्र पुरस्कृत एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम [IWMP] अंतर्गत सन 2009-10 पासुन महाराष्ट्रातील मंजुर प्रकल्पांसाठी केंद्र शासनाच्या सामाईक मार्गदर्शक सूचनां 2011 लागू करण्यात आलेल्या असून यातील तरतूदींप्रमाणे राज्य शासनांना विशेष अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

...2/-

त्यानुसार महाराष्ट्र शासनाने वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा [VWDA] ही संस्था स्थापन करुन संस्था नोंदणी अधिनियम 1860 नुसार नोंदणी केली आहे. IWMP प्रकल्पांच्या क्षमता बांधणी व प्रशिक्षणांसाठी वसुंधरा यंत्रणेने यशदा, पुणे या संस्थेची शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून निवड केली आहे.

पक्ष एक, प्रकल्प व्यवस्थापक WCDC [लिहून घेणार ] हे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय यंत्रणेचे प्रमुख आहेत. पक्ष दोन, प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा [PIA] हे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्पाचे प्रकल्प स्तरावरील प्रमुख आहेत. पक्ष तीन, प्रकल्प प्रशिक्षण संस्था [PTO] हे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प स्तरावरील क्षमता बांधणी व प्रशिक्षणांसाठी इच्छुक संस्था आहे.

यात **सी.एस.आर.डी.** या संस्थेची **IWMP-18** या जिल्हा प्रकल्पांतर्गत प्रकल्प प्रशिक्षण संस्था [PTO] म्हणून निवड केली आहे. त्यानुसार यशदा, पुणे या संस्थेने निश्चित केलेल्या क्षमता बांधणी कार्यक्रमानुसार प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे.

प्रकल्प प्रशिक्षण संस्थेस खालीलप्रमाणे प्रकल्प प्रशिक्षणाकरिता सोपविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | तालुका | ग्रामपंचायत संख्या | उपचार क्षेत्र | प्रकल्प मुल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1. | IWMP-18 | नगर | 6 | 3693.53 | 6,24,250/- |

एकात्मिक पाणलोटव्यवस्थापन कार्यक्रम [IWMP] अंतर्गत मंजुर प्रकल्पांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून दिनांक :- १०/०२/२०१४ रोजी त्रिसदस्यीय सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

1. निश्चित केलेल्या प्रकल्पात यशदा, पुणे या संस्थेने ठरवुन दिलेल्या एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे काम ठरवून दिलेल्या कालावधीत प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा [PIA] व प्रकल्प व्यवस्थापक यांचे मार्गदर्शनानुसार पूर्ण करावे.
2. प्रशिक्षण कार्यक्रमाचे अनुषंगाने वाचन साहित्याचे वाटप करणे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे संभाव्य वेळापत्रक तयार करणे, प्रशिक्षण कार्यक्रमाचा वार्षिक कृती आराखडा तयार करणे इत्यादी कामे करुन प्रकल्प व्यवस्थापक यांचे संमतीने व प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा [PIA] यांचे समन्वयाने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक आहे.
3. प्रशिक्षणासाठी प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस याप्रमाणे रुपये 150/- परिचय प्रशिक्षणासाठी व रु. 300/- जिल्हयांतर्गत व रु. 600/- जिल्हयाबाहेरील सहलींसाठी तसेच जाणीवजागृती मेळाव्यासाठी प्रति कार्यक्रम रु. 10000/- [दहा हजार रु. फक्त] या प्रमाणे मापदंड निश्चित केलेला आहे. प्रशिक्षणसाठी आवश्यक खर्च सोबतच्या प्रपत्रात ठरवुन दिलेल्या बाबीनुसार करण्यात यावा.

प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थी संख्येनुसार निधीची मागणी प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा [PIA] यांचे शिफारशीने प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडे करावी. झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे अहवाल प्रकाय स्तरावर जतन करण्यात येतील. दर महिन्याच्या 5 तारखेच्या आत मागील महिन्यात प्रकल्प निहाय झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या निधींचा अहवाल प्रकाय यांच्या शिफारशीने प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडे सादर करण्यात येईल. त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापक हा निधी प्रकल्प प्रशिक्षण संस्थेस वितरीत करतील. प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडे निधी मागणी प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याचे आत निधी वितरीत करण्यात येईल.

4. प्रशिक्षणासाठी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, बाबनिहाय खर्चाचे तपशिल आणि प्रशिक्षण संबंधीचे अहवाल जसे की, प्रशिक्षणार्थी यादी, मूल्यमापन अहवाल इत्यादी तपासण्याची व जतन करण्याची कार्यवाही प्रकाय यांचे स्तरावर होईल व सदर अहवाल प्रकल्प व्यवस्थापक यांना प्राप्त झाल्यानंतर पुढील निधी वितरीत करण्यात येईल.

5. प्रशिक्षणासाठी दृकश्राव्य माध्यम, चित्रफिती, इत्यादीचा वापर करुन प्रशिक्षण कार्यक्रम अधिकाधिक परिणामकारक व गुणवत्तापूर्वक होतील याकडे विशेषत्वाने लक्ष देणे बंधनकारक आहे.

6. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थी स्वयंसहाय्यता गट [SHG] उपभोक्ता गट [UG] समुदाय [Community] संबंधीत माहिती प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांचेकडून प्राप्त करुन घेवून सतत अदयावत ठेवावे.

   प्रकल्प प्रशिक्षण संस्था यांनी घ्यावयाच्या प्रशिक्षणाचे गाववार नियोजन, नियोजनानुसार प्रशिक्षण होते किंवा नाही. झालेल्या प्रशिक्षणांचे अहवाल तपासणे व जतन करणे, दरमहा प्रशिक्षणाच्या निधीची शिफारस प्रकल्प व्यवस्थापक यांचेकडे करणे इ. सर्व कार्यवाही प्रकाय यांनी करावी. व याबाबत आवश्यक तो समन्वय ठेवण्याची जबाबदारी प्रकल्प प्रशिक्षण संस्थेची राहील.

7. प्रशिक्षणा संबंधी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे तसेच जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष WCDC आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प व्यवस्थापक तसेच प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांचेशी समन्वय ठेवून प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करावेत.

8. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आयोजना मध्ये कोणतेही अनुचित प्रकार होणार नाहीत याची संस्थेने खबरदारी घ्यावयाची आहे. गैरप्रकार झाल्याचे आढळून आल्यास संबंधीत संस्थेचे काम काढून घेण्याचा किंवा संस्थेबरोबरचा करार रद्द् करण्याचा अधिकार जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहीती केंद्र यांचा राहील. याबाबतचा अंतिम निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांचा राहील.

9. सनियंत्रण, मूल्यमापन आणि लेखापरिक्षण इत्यादी कामासाठी प्रकल्प व्यवस्थापक आणि त्यांचे प्रतिनिधींना वेळोवेळी आवश्यक ते अभिलेख आणि प्रशिक्षणासंबंधी कागदपत्रे उपलब्ध करुन देणे तसेच संस्थेच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
10. प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या निधींचे महिनानिहाय उपयोगीता प्रमाणपत्र संस्थेने प्रकल्प कार्यान्वियन यंत्रणा यांचेकडे सादर करावे. तसेच 31/3/2014 अखेर एकत्रित उपयोगीता प्रमाणपत्र प्रकाय यांचे मार्फत प्रकल्प व्यवस्थापक यांना सादर करावे.
11. सदर करारामधील अटी व शर्तींचा भंग केल्यास 30 दिवसाची नोटीस देऊन करार संपुष्टात आणता येईल.
12. सदर करारासंदर्भात काही वाद निर्माण झाल्यास संबंधीत जिल्हयाचे कार्यक्षेत्रातील न्यायालयाचे अधिन राहिल.
13. सदर करारनाम्याची मुदत दि. 31/3/2014 पर्यंत राहील.

संस्था अध्यक्ष/सचिव
प्रा. के.के.कनोजिया
प्रभारी संचालक

प्रकल्प कार्यान्वयन संस्था
प्रकल्प कार्यान्वयीत यंत्रणा (IWMP-18)
तथा
मंडळ कृषि अधिकारी,अकोळनेर,ता.नगर

- संस्थेचे नाव व शिक्का :- Director
BPHE Society's
Centre for Studies in Rural Developement
Institute of Social Work & Research
Ahmednagar-414001

BPHE Society's 1947-1931

दिनांक : 90/09/2098
ठिकाण: अहमदनगर

- साक्षीदार
1. ____________
2. ____________

प्रकल्प व्यवस्थापक WCDC
जिल्हा :- अ. नगर

साक्षीदार
1. ____________
2. ____________